Bharatiya Shikshan Prasarak Sanstha, Ambajogai

# Swa. Sawarkar Mahavidyalaya, Beed



## Internal Quality Assurance Cell

### Criteria 6- Governance, Leadership & Management

### Key Indicator 6.3: Faculty Empowerment Strategies

**6.3.1: The institution has performance appraisal system, effective welfare measures for teaching and non-teaching staff and avenues for career development/progression**

## Sikshak (Sevak) Kalyan Nidhi Yojana



# शिक्षक कल्याण निधी योजना

आजारी असताना इलाजासाठी मदत हवी असल्यास कर्मचाऱ्याने किंवा नामनिर्देशित जवळच्या नातेवाईकाने- (आई/वडील, पत्नी/पती) - अर्ज करावा, त्यावर संस्थेची स्थानिक कार्यवाह यांची शिफारस घेऊन अर्ज संस्थेच्या कार्यालयात द्यावा. मृत्यूनंतर द्यावयाच्या मदतीसाठी मुख्याध्यापक किंवा स्थानिक कार्यवाह यांनी तात्काळ संस्था कार्यालयास कळवावे.

शिक्षक कल्याण निधीसाठी कायमस्वरूपी ठेव बँकेत ठेवली आहे. त्यावर येणाऱ्या व्याजातून मदत दिली जाईल. त्यासाठी स्वतंत्र खाते काढले आहे. अध्यक्ष, कार्यवाह आणि एक शिक्षक प्रतिनिधी वा मुख्याध्यापक प्रतिनिधी यांच्या संयुक्त सहीने आर्थिक व्यवहार करण्यात येईल.

## संस्थेची समिती अशी आहे.

| | |
|---|---|
| अध्यक्ष | श्री. अनिल अं. महाजन |
| कार्यवाह | श्री. सतिश रा. पत्की |
| सदस्य | डॉ. प्रकाश आनंदगावकर |
| सदस्य | श्री. रामचंद्र न. झंवर |
| सदस्य | श्री. प्रकाश मु. जोशी |
| सदस्य | श्री. चंद्रकांत अ. मुळे |
| सदस्य | श्री. गोविंद प्र. पांडव |
| सदस्य | श्रीमती ज.ह. राठोड |
| सदस्य | डॉ. नितीन धर्मराव |



समितीचे पदाधिकारी पदाने संस्था अध्यक्ष, कार्यवाह, उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष, संस्कारकेंद्र प्रमुख व शिक्षक प्रतिनिधी असतील. तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती समिती करेल.


**पत्रव्यवहारासाठी पत्ता**

केंद्र कार्यालय, भारतीय शिक्षण प्रसारक संस्था
खोलेश्वर माध्यमिक विद्यालय परिसर, अंबाजोगाई, जि. बीड
फोन क्रमांक : ०२४४६ - २४८१२२


केल्याने होत आहे रे । आधि केलेचि पाहिजे ॥

## भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई, जि. बीड

# शिक्षक कल्याण निधी योजना



# शिक्षक कल्याण निधी योजना

शिक्षक बंधु-भगिनी,

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या हीरक महोत्सवानिमित्त आपण सर्वांनी भरभरुन योगदान दिलेत त्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन.

अलिकडच्या काळात सर्वांचेच जीवन धावपळीचे, ताणतणावाचे झाले आहे. या धावपळीमुळे, रासायनिक फवारणी आणि भेसळीयुक्त आहारातील झालेला बदल तसेच व्यायामाचा अभाव यामुळे आपल्यावरील तणाव अधिकच वाढला आहे. अगदी तरुण वयात हृदयविकार, कॅन्सर यासारख्या आजारांना आज सामोरे जावे लागत आहे. अशा आजारांवरचा खर्चही भरमसाठ येतो आणि मग कुटुंबाची आर्थिक घडीच विस्कटून जाते.

धावपळीच्या जीवनामुळे एखाद्यावेळी अपघाताने अथवा आजारपणामुळे घरातील कमावत्या व्यक्तीचे निधन झाल्यास संपूर्ण कुटूंब कोसळून पडते.

आपली संस्था ही शिक्षकांनी स्थापन केलेली संस्था आहे त्यामुळे शिक्षकांच्या सुख-दुःखात ती सदैव सहभागी होत आलेली आहे. त्यामुळेच आपण शिक्षक कल्याण निधी योजनेची सुरुवात करत आहोत. या योजनेनुसार आजारपणात उपचारासाठी आणि सेवेत असताना दुर्दैवी मृत्यू झाल्यास कुटुंबाला आर्थिक मदत देण्याची व्यवस्था केली आहे.

संस्था सदैव आपल्या पाठीशी आहे. सर्वांना शुभेच्छा.

**- प्रा. सतीश पत्की**

कार्यवाह, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई







## शिक्षक कल्याण निधी योजना

**खालील आजारात मदत मिळवता येईल.**

**हृदयविकार**

- हृदयशस्त्रक्रिया (Heart Surgery)
- उपमार्गशस्त्रक्रिया (Bye Pass Surgery)
- अँजिओप्लास्टी शस्त्रक्रिया (Angioplasty)

**मूत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया**

**मेंदूतील गाठ** (Brain Tummer)

**पक्षाघात** (Paralysis)

**मेंदूतील रक्तस्राव** (Brain Haemarrage)

**सर्व प्रकारचे कॅन्सर** (All Types Cancer)

**Prevention Is Better Than Cure.**

**संस्था सदैव आपल्या पाठीशी आहे.**